# जाहिरात नमुना सन २०२५-२६ (१ ली जाहिरात)

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर.

==========================================================

राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर येथून सोलापुर जिल्हयांतर्गत जिल्हास्तर, तालुकास्तर, उपजिल्हा रुग्णालयस्तर, ग्रामीण रुग्णालयस्तर आणि प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर राबविण्यात येत असलेल्या विविध योजनेतील १४ संवर्गातील रिक्त असलेल्या एकुण ११२ रिक्त पदांची पदभरती प्रक्रिया राबविण्यात येत असुन, सदरील पदे ही कंत्राटी स्वरुपाची आणि करार तत्वावरील व एकत्रित मानधनावरील असुन, खालील तक्तानुसार पात्र ठरत असलेल्या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

(अ.जा. = SC, अ.ज.=ST, वि.जा.अ.=VJ-A, भ.ज.ब = NT-B, भ.ज.क=NT-C, भ.ज.ड=NT-D, वि.मा.प्र=SBC, इ.मा.व=OBC, आ.दु.घ = EWS, सा.शै.मा.=SEBC, अराखीव=OPEN)

| अ. क्र. | पदांचे नाव | पदांचे उपनाव | रिक्त पद संख्या | पदांची शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | पदांचे मानधन | एकुण रिक्त संख्या | सामाजिक आरक्षण | अनुभव | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेषतज्ञ | Surgeon - IPHS | **01** | MS General Surgery / DNB | ७० वर्षापर्यंन्त | रु.७५,०००/- | ०६ | अ.जा. २<br>आ.दु.घ २<br>सा.शै.मा २ | ----- | ग्रा.रु अक्कलकोट |
| | | Physician - IPHS | **01** | MD Medicine / DNB | | | | | ----- | उ.जि.रु. अकलुज |
| | | Physician - NPCDCS | **01** | MD Medicine / DNB | | | | | ----- | जिल्हा रुग्णालय |
| | | Physician - NPHCE | **01** | MD Medicine / DNB | | | | | ----- | जिल्हा रुग्णालय |
| | | Psychiatrists NMHP | **01** | MD Psychiatry / DPM / DNB | | | | | ----- | जि.श.चि कार्या, |
| | | Orthopaedics IPHS | **01** | MS Ortho /D Ortho | | | | | ----- | जिल्हा रुग्णालय |
| २ | **वैदयकिय अधिकारी** MBBS | MO MBBS NPNCD | **01** | MBBS With Valid Coucil Registration | ७० वर्षापर्यंन्त | रु. ६०,०००/- | ०९ | वि.जा.अ १<br>भ.ज.ब १<br>इ.मा.व ३<br>आ.दु.घ २<br>सा.शै.मा १<br>अराखीव १ | ----- | जिल्हा रुग्णालय |
| | | MO MBBS L2 | **02** | | | | | | ----- | ग्रा.रु. वळसंग, ग्रा.रु. नातेपुते |
| | | MO MBBS L3 | **05** | | | | | | ----- | **उ.जि.रु.** पंढरपूर, करमाळा, अकलूज **ग्रा.रु.** अक्कलकोट, वडाळा |
| | | MO MBBS SNCU | **01** | | | | | | ----- | स्त्री रुग्णालय |
| ३ | **वैद्यकिय अधिकारी RBSK** | MO RBSK **Male** | **01** | BAMS / BUMS with Valid Coucil Registration | ४३ वर्षापर्यन्त | रु. २८,०००/- | ०१ | इ.मा.व. १ | ----- | ग्रा.रु. अक्कलकोट |
| | | MO RBSK **Female** | **02** | | | | ०२ | सा.शै.मा. २ | ----- | ग्रा.रु. माळशिरस ग्रा.रु कुर्डूवाडी |
| ४ | **ऑडिओलॉजिस्ट** | Audiologist DEIC | **01** | Degree in Audiology with Valid Council Registration | अराखीव करीता ३८ वर्षे व राखीव करीता ४३ वर्षे | रु. २५,०००/- | ०२ | अ.जा. १<br>अराखीव १ | ----- | स्त्री रुग्णालय |
| | | Audiologist NPPCD | **01** | | | | | | ----- | जिल्हा रुग्णालय |
| ५ | **श्रवणक्षम प्रशिक्षक** | Paramedic Hearing Instructor | **01** | Graduate Degree in Relevant Course with Valid Council Registration | | रु. २५,०००/- | ०१ | कोणताही प्रवर्ग | ----- | जि.श.चि कार्यालय |
| ६ | **मनोविकृती नर्स** | Psychiatric Nurse | **01** | GNM / B.Sc Nursing **with Certification in Psychiatry** from Reputed Institute with Valid Council Registration | | रु. २५,०००/- | ०१ | कोणताही प्रवर्ग | ----- | जि.श.चि कार्यालय |

| अ. क्र. | पदांचे नाव | पदांचे उपनाव | रिक्त पद संख्या | पदांची शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | पदांचे मानधन | एकुण रिक्त संख्या | सामाजिक आरक्षण | अनुभव | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | आरोग्य अधिपरीचारीका | Staff Nurse IPHS | 07 | GNM / B.Sc Nursing / M.Sc Nursing with Valid MNC Registraition | अराखीव करीता ३८ वर्षे व राखीव करीता ४३ वर्षे | रु. २०,०००/- | ३६ | अ.जा. ३<br>वि.जा.अ २<br>भ.ज. ब १<br>भ.ज. क १<br>भ.ज. ड १<br>इ.मा.व. ६<br>वि.मा.प्र. २<br>आ.दु.घ ७<br>सा.शै.मा. ४<br>अराखीव ९ | ----- | **उ.जि.रु.** पंढरपूर - १<br>**प्रा.आ. केंद्र** जवळा - १, वळसंग - १, गादेगाव - २, सलगर - २ |
| | | Staff Nurse NPCDCS | 01 | | | | | | ----- | जि.श.चि कार्या, |
| | | Staff Nurse NCD | 02 | | | | | | ----- | जिल्हा रुग्णालय, ग्रा.रु. कुर्डूवाडी, |
| | | Staff Nurse PHC | 01 | | | | | | ----- | प्रा.आ.केंद्र मोंडनिंब |
| | | Staff Nurse SUMAN | 03 | | | | | | ----- | ग्रा.रु. सांगोला, बार्शी, करकंब |
| | | Staff Nurse L3 | 01 | | | | | | ----- | उ.जि.रु. अकलूज ता.माळशिरस |
| | | Staff Nurse L2 | 07 | | | | | | ----- | **ग्रा.रु.** पांगरी, **प्रा.आ. केंद्र** टेभुर्णी, गादेगाव, घेरडी, कोळा, बोरामणी, भंडारकवठे, |
| | | Staff Nurse NPNCD | 02 | | | | | | ----- | जिल्हा रुग्णालय, सोलापूर |
| | | LHV PHC | 01 | | | | | | ----- | **प्रा.आ.केंद्र,** उंबरेपागे |
| | | Staff Nurse DEIC | 01 | | | | | | ----- | स्त्री रुग्णालय, सोलापूर |
| | | Staff Nurse SNCU | 02 | | | | | | ----- | उ.जि.रु. पंढरपूर |
| | | Staff Nurse KMC | 02 | | | | | | ----- | उ.जि.रु. पंढरपूर |
| | | Staff Nurse NBSU | 03 | | | | | | ----- | **उ.जि.रु.** अकलूज, **ग्रा.रु.** मोहोळ, करकंब |
| | | Staff Nurse ICU/HDU's | 03 | | | | | | ----- | उ.जि.रु. पंढरपूर |
| ८ | आरोग्य सेविका | ANM (SC) | 11 | ANM Course With Valid MNC Coucil Registration | | रु. १८,०००/- | १६ | इ.मा.व ५<br>आ.दु.घ ५<br>सा.शै.मा २<br>अराखीव ४ | ----- | **उपकेंद्र स्तर** गावपातळीवर |
| | | ANM (RCH) | 01 | | | | | | ----- | ग्रा.रु. कुर्डूवाडी |
| | | ANM (RBSK) | 04 | | | | | | ----- | ग्रा.रु. मंद्रूप, मोहोळ, कुर्डूवाडी, अक्कलकोट |
| ९ | औषध निर्माता | Pharmacist RBSK | 01 | D.Pharm / B.Pharm With Valid Coucil Registration & PPP Certificate | ४३ वर्षापर्यन्त | रु. १७,०००/- | ०१ | सा.शै.मा १ | ----- | ग्रा.रु. सांगोला |
| १० | तंत्रज्ञ | Dental Hygienist - NOHP | 02 | Diploma in Oral Hygienist with Council Registration | ४३ वर्षापर्यन्त | रु. १७,०००/- | ०३ | वि.जा.अ १<br>इ.मा.व. १<br>आ.दु.घ. १ | ----- | जिशचि कार्या - १<br>पंढरपूर - १ |
| | | Audiometric Assistant NPPCD | 01 | Diploma in Audiometry with Council Registration | | | | | ----- | जि.श.चि. कार्यालय |

| अ. क्र. | पदांचे नाव | पदांचे उपनाव | रिक्त पद संख्या | पदांची शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | पदांचे मानधन | एकुण रिक्त संख्या | सामाजिक आरक्षण | अनुभव | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | वैदयकिय अधिकारी (MBBS / BAMS) १५ th FC | MO MBBS/BAMS 15th FC | 03 | MBBS / BAMS With Coucil Registration **(For MBBS, Age Upto 70 Year)** | अराखीव करीता ३८ वर्षे व राखीव करीता ४३ वर्षे | **For MBBS** रु.60,000/- **For BAMS** रु.25,000/- + PBI रु.15,000/- | ०३ | अ.ज १<br>भ.ज. क १<br>आ.दु.घ १ | ----- | माळशिरस १<br>करमाळा २ |
| १२ | आरोग्य अधिपरीचारीका १५ th FC | Staff Nurse 15th FC | 13 | GNM / B.Sc Nursing With Valid MNC Coucil Registration | | रु. २०,०००/- | १३ | अ.जा. १<br>अ.ज.- १<br>भ.ज. क २<br>वि.मा.प्र. १<br>इ.मा.व १<br>सा.शै.मा. ३<br>अराखीव ४ | ----- | बार्शी - १<br>करमाळा - २<br>सांगोला - १<br>मंगळवेढा - १<br>पंढरपूर - ३<br>सांगोला - १<br>मोहोळ - १<br>माळशिरस - १<br>सो.म.पा - २ |
| १३ | एम.पी.डब्लू - पुरुष १५ th FC | MPW - Male 15th FC | 14 | **12th Science with** Semi- Medical basic training course prescribed by the Health and Family Welfare Training Center of the Department or Public Health Institute, Nagpur for the post of Health Officer. **OR** Must have completed & Passed the Sanitary Inspector approved by the Ministry of Health and Family Welfare. **OR** Sanitary Inspector Approved by the Govt. of Maharashtra. | | रु. १८,०००/- | १४ | अ.जा. ३<br>अ.ज २<br>इ.मा.व ३<br>सा.शै.मा. ३<br>अराखीव ३ | ----- | अक्कलकोट १<br>मैदर्गी - १<br>बार्शी - २<br>करमाळा - २<br>सांगोला - १<br>मंगळवेढा - १<br>पंढरपूर - ३<br>सांगोला - १<br>कुर्डूवाडी - १<br>सो.म.पा.- १ |
| १४ | वैदयकिय अधिकारी MBBS Telemedicine | MO MBBS Telemedicine Hub | 04 | MBBS With Valid Coucil Registration | ७० वर्षापर्यंन्त | रु. ६०,०००/- | ०४ | वि.जा.अ १<br>इ.मा.व १<br>सा.शै.मा १<br>अराखीव १ | ----- | जिल्हा रुग्णालय, सोलापूर |
| | एकुण रिक्त पद संख्या | | 112 | | | | | | | |

## सुचना, अटी व शर्ती :-

१) वरील सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन, त्यांचा कालावधी हा दि.३१/०३/२०२६ पर्यन्तचा राहील. परंतू त्याआधी सदरील पद भविष्यात सन २०२५-२६ मध्ये नामंजूर / रद्द झाल्यास किंवा सन २०२६-२७ करीता सदरील पदांना मंजूरी अप्राप्त राहिल्यास वरील सर्व पदांची सेवा दिनांक ३१/०३/२०२६ रोजी आपोआप संपुष्टात येईल. पंरतू वरील पदे सन २०२६-२७ करीता मंजूर झाल्यास पुढील ११ महिने २९ दिवसाकरीता पुनर्नियुक्ती समाधानकारक कार्यकालानंतर देण्यात येईल.

२) उमेदवारांकडून दिनांक ०२/०६/२०२५ ते दिनांक १०/०६/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत, सुट्टीचे दिवस वगळून **सकाळी ११.०० ते दुपारी ०४.०० या वेळेतच अर्ज स्विकृती करण्यात येईल. अर्ज स्विकृती ही जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर** या ठिकाणी करण्यात येईल.

३) **उमेदवारांस एकापेक्षा जास्त पदाकरीता अर्ज सादर करायचा असल्यास, प्रत्येक पदाकरीता स्वंतत्रपणे अर्ज सादर करावा. पंरतू वेळप्रसंगी एकाच वेळी मुलाखत/परिक्षा घेतली गेल्यास कोणत्या तरी एका पदाकरीता उपस्थित रहावे लागेल. ज्यास उपस्थिती राहील त्या पदाकरीता संबधित उमेदवार ग्राहय धरुन, दुसऱ्या पदाकरीता गैरहजरी ग्राहय धरण्यात येईल.**

४) पदभरती प्रक्रियेकरीता प्रत्येक अर्जाकरीता **अराखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.१५०/- (अक्षरी रु.एकशे पन्नास फक्त ) व राखीव प्रवर्गातील उमेदवारांना रु.१००/- (अक्षरी रक्कम रु. शंभर रुपये फक्त)** इतके शुल्क आकारण्यात येत असुन, सदरील शुल्क हे **डिमांड ड्राफट (Demand Draft) स्वरुपात** स्विकारण्यात येईल. सदरील शुल्क हे नापरतावा (Non Refundable) असुन, उमेदवारांनी डिमांड ड्राफट हे District Integrated Health & Family Welfare Society, Solapur या **संपूर्ण नावे** असावा, डिमांड ड्राफट हा अर्जावर एकदम वरच्या बाजुस जोडण्यात यावा. **डिमांड ड्राफटच्या मागील बाजुस उमेदवारांने त्यांचे संपूर्ण नाव, अर्ज सादर केलेल्या पदांचे नाव, पद क्रमांक टाकावा.** जर डिमांड ड्राफटच्या नावामध्ये चुक आढळल्यास अथवा खराब असल्यास संबधित उमेदवाराचा अर्ज पदभरतीच्या पुढील संपूर्ण प्रक्रियेकरीता ग्राहय धरला जाणार नाही व **तसेच उमेदवारांस कोणत्याही टप्प्यावर नव्याने डिमांड ड्राफट सादर करण्याची मुभा देण्यात येणार नाही, यांची उमेदवारांनी जाणीवपुर्वक नोंद घेण्यात यावी.**

५) वरील सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनावरील असल्याने, सदर पदाकरीता शासकिय सेवेनुसार असलेले नियम, अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही. त्याचसोबत यावरील सर्व पदाकरीता शासनाकडील सेवा नियम लागू होत नाहीत.

६) सर्व पदांकरीता उमेदवारांनी अर्ज सादर करताना जन्म तारीख पुरावा म्हणुन, **१० वी सनद** किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्म दाखला यापैकी एक सादर करावे. पदवीचे गुणपत्रक (१ ले वर्ष ते अंतिम वर्ष **{सर्व Attempt सह} - जेणेकरुन एकत्रित गुण काढणे शक्य होईल), पदवी प्रमाणपत्र (Convocation Certificate), ज्या-त्या शैक्षणिक अर्हतेस संबधित परिषदेकडील नोंदणी लागू आहे त्या-त्या शैक्षणिक अर्हतेची वैद्य असलेली परिषदेकडील नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वय अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणुन (शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला), उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र व इतर आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे अर्जासोबत सादर करावीत.**

७) जाहिरातीतील पदाकरीता नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेसोबत, संबधित परिषदेकडील नोंदणी करणे लागू होत असल्यास, उमेदवारांने वैद्य असलेली नोंदणीचे प्रमाणपत्र/Renewal Slip/Smart Card / Registration Apply Form व इतर हयाबाबी अर्जासोबत सादर कराव्यात. त्याचसोबत अतिरीक्त शिक्षणाची नोंद ही परिषदेकडे केलेली असावी. परिषदेकडील Smart Card असलयास त्याची झेरॉक्स प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. तसेच सदरील प्रमाणपत्रावरील नोंदणीची वैद्यता ही ग्राहय धरणे सोईस्कर होईल. **(नोंदणी करीता फी भरलेली पावती असल्यास, अर्ज पदभरती प्रक्रियेकरीता ग्राहय धरुन, मुळ कागदपत्रे तपासणीस संबधित प्रमाणपत्र उमेदवार सादर करु न शकल्यास संबधित उमेदवारास पदभरतीच्या पुढील टप्प्यावरुन वगळण्यात येईल, यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.)**

८) ठराविक प्रमाणपत्रामध्ये Grading System **(विशेषत: CGPA/ SGPA)** नुसार मार्क असतील त्यांनी संबधित प्रमाणपत्रामागील Grade Card झेरॉक्स अर्जासोबत सादर करावी. त्याचसोबत संबधित उमेदवारांनी अर्जासोबत Grade to Percentage Convertion मध्ये रुपातंरीत केलेले शिक्षण घेतलेल्या संस्थेच्या/कॉलेजच्या/विदयापीठाच्या लेटरपॅडवर सही शिक्कयाचे प्रमाणपत्र अथवा त्याबाबतचा दाखला अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहिल. गुणपत्रकावर % नमुद असेल पंरतू Semister गुण हे Gradding नुसार असतील तर त्याबाबत गुणदर्शविणारे गुणपत्रक जोडण्यात यावे.

९) उमेदवारांनी अर्जासह जोडलेल्या सर्व कागदपत्रावर पृष्ठ क्रमांक टाकण्यात यावेत. अर्ज सादर केल्याची पोहोच घेणेकरीता अर्जाच्या वरील पृष्ठभागाची झेरॉक्स घेऊन येणे.

**१०) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार असलेला प्रवर्ग आणि बँकेचे नाव व डिमांड ड्राफट क्रमांक अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावे.**

जि.प.आरोग्य विभाग, जि.प. सोलापूर

११) **उपरोक्त पदभरतीबाबत असलेल्या सर्व सुचना (तात्पुरते पात्र/अपात्र, हरकती स्विकारणे, अंतिम पात्र/अपात्र, कागदपत्रे तपासणीस पात्र ठरलेल्यांची यादी, संभाव्य निवड झालेल्यांची यादी, जर निवड समितीमार्फत ठराविक पदांची मुलाखत अथवा लेखी परिक्षा घेण्याचे ठरविले तर त्याबाबतचे वेळापत्रक व इतर बाबी) हया जिल्हा परिषद, सोलापुर चे अधिकृत संकेतस्थळ www.zpsolapur.gov.in वर प्रसिध्द करण्यात येतील. याबाबत उमेदवारांस कोणतेही सुचना, दूरध्वनी निरोप, SMS, Email केला जाणार नाही यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी. उमेदवारांनी वेळोवळी संकेतस्थळास भेट देणे अनिवार्य राहिल.**

१२) सदर रिक्त पदांची संख्या, शैक्षणिक अर्हता, मानधन, वयोमर्यादा, सामाजिक आरक्षण, नियुक्ती ठिकाणामध्ये बदल, नमुद केलेल्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन पदभरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर व मा. जिल्हा आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१३) सदर रिक्त पदांसाठी आवश्यक पात्रता असलेला अर्ज न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संख्येत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरीता असलेले पात्रता आवश्यक्तेनुसार शिथील करण्यात येईल.

१४) तसेच आवश्यक त्या संख्येमध्ये राखीव प्रवर्गाचे उमेदवार आवश्यक प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास, सदर रिक्त पदांच्या पदभरतीची आवश्यक्ता लक्षात घेता अराखीव प्रवर्गातील प्रतिक्षाधीन उमेदवारास राखीव प्रवर्गाकरीता तात्पुरत्या स्वरुपामध्ये नियुक्ती देण्यात येईल. **(सदरची अट ही ज्या पदाकरीता खुला प्रवर्गाच्या जागा आहेत तिथेच लागू राहिल)**

१५) **राष्ट्रीय आरोग्य अभियान मधील सर्व स्तरावरील पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असल्याने, सद्यस्थितीत बदली बाबत कोणतेही धोरण नसल्याने उमेदवारांस नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही सबबीवर अथवा तक्रारीमुळे पदस्थापनेत बदल करुन दिला जाणार नाही यांचे उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

१६) राखीव प्रवर्गातुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येतील. कंत्राटी स्वरुपाची पदे असल्याने जात वैद्यता प्रमाणपत्रांची (Cast Validity) आवश्यकता नाही. तरी उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.

१७) **ठराविक प्रमाणपत्र सादरीकरण करणेकामी सेतु कार्यालयाकडील पावती अर्जासोबत सादर केलेली असल्यास, सदरील उमेदवारांचे अर्ज पात्रतेकरीता ग्राहय धरण्यात येतील. पंरतू, उमेदवारांनी हरकती वेळेस अथवा मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळेस, संबधित प्रमाणपत्र उमेदवार सादर करु न शकल्यास संबधित उमेदवारास पदभरतीच्या पुढील टप्प्यावरुन वगळण्यात येईल, यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

१८) उमेदवारांकडून अर्धवट अर्ज सादर करणे, अपूर्ण कागदपत्रे, वाचण्यायोग्य नसलेली ( Xerox स्पष्ट नसलेली ) कागदपत्रासह अर्ज सादर केला गेला असल्याने, संबधित उमेदवारांचा अर्ज नाकारला गेल्यास, अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची सर्वस्वीपणे संपूर्ण जबाबदारी संबधित उमेदवारांची राहिल याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार स्विकारली जाणार नाही. अर्ज भरणेकामी काही अडचणी असल्यास कार्यालयास समक्ष भेट देऊन विचारणा करण्यात यावी.

१९) उमेदवार हा संबधित पदासाठी शाररीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा. तसेच उमेदवारांविरुध्द कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा दाखल झालेला नसावा. तसेच संबधित उमेदवारांबाबत त्याबाबतची माहिती कार्यालयास प्राप्त झाल्यास, संबधित उमेदवारांस पदभरतीच्या कोणत्याही टप्प्यातुन बाद ठरविण्यात येईल अथवा नियुक्तीनंतर सेवेतुन कमी करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

२०) केंद्र सरकार अथवा राज्य शासनाकडून संबधित पद नामंजूर केल्यास उमदेवारांस कोणतीही पुर्वसुचना न देता संबधित उमेदवारांची सेवा तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

रा.आ.अ.,आरोग्य विभाग,जि.प.सोलापूर

२१) उमेदवाराने अर्ज सादर केलेल्या पदांशी निगडीत संबधित उमेदवारांस अनुभव असल्यास सदरील अनुभव ग्राहय धरण्यात येऊन त्याबाबचे नियमावलीनुसार गुण देण्यात येतील यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी. इतर क्षेत्रातील अथवा अर्ज सादर केलेल्या पदाशी निगडीत नसलेला अनुभव असल्यास सदरील अनुभव हा ग्राहय धरला जाणार नाही तसेच त्याबाबतचे गुण ही दिले जाणार नाहीत, यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

२२) पदभरती निवड समितीमार्फत एखादया पदकरीता पात्र उमेदवारांची संख्या जास्त प्रमाणात असल्याने, जर त्या पदांची लेखी परिक्षा घेण्याचे ठरविल्यास, संबधित लेखी परिक्षेत पडलेले गुण हेच अंतिम धरुन, त्याप्रमाणे गुणवत्तेनुसार सदरील पदभरतीची पुढील प्रक्रिया राबविण्यात येईल. लेखी परिक्षेच्या गुणामध्ये इतर कोणत्याही स्वरुपाचे गुण मिसळून त्यांची सुधारीत गुण यादी तयार केली जाणार नाही. यांची उमेदवारांनी प्रामुख्याने नोंद घ्यावी.

**२३) उमेदवारांनी मुद्दा क्रमांक ०२ मधील नमुद केलेल्या कालावधीतील दिलेल्या वेळेत, प्रथम प्राध्यान्याने समक्ष येऊन अर्ज सादर करण्यात यावेत. नमुद मुदतीनंतर व वेळेनंतर कोणत्याही सबबीवर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार अथवा कोणताही दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये. पोस्टाने अथवा कुरिअरने अर्ज पाठविताना, पोस्टमन यांच्याकडून अर्ज नमुद मुदतीत व वेळेत कार्यालयास प्राप्त झाला तरच अर्ज पदभरती प्रक्रियेकरीता ग्राहय धरण्यात येईल यांची नोंद उमेदवारांनी प्रामुख्याने घेण्यात यावी. मुदतीनंतर पोस्टाने अथवा कुरीअर ने प्राप्त होणारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. सदरील अर्ज परत उमेदवारांच्या पत्त्यावर पाठविण्याची जबाबदारी संबधित पोस्ट/कुरीअर यांची राहिल, यांची सर्व उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.**

२४) पदभरतीतील पदे ही राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दि.२७/०४/२०२३ रोजीच्या पत्रातील दिलेल्या सुचनेनुसार गुणांकन पध्दतीने भरली जातील. गुणांकन पध्दत ही पुढील प्रमाणे राहिल.

| अ.क्र. | विवरण | तपशिल | अधिकतम गुण |
|---|---|---|---|
| १ | पदासाठी आवश्यक Qualifying Exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या अधारे) | अंतिम वर्षाकरीता मिळालेल्या एकुण गुणाच्या टक्केवारीचे ५०% प्रमाणे Proportion राहिल. (उदा:- ६० % गुण प्राप्त असल्यास, त्यांचे ५० % प्रमाणे) {Proportion= ६० X ५०/१०० = ३० गुण} | जास्तीत जास्त ५० गुण ग्राहय धरले जातील |
| २ | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घेण्यात येईल) | **अधिकतम २० गुण ग्राहय धरले जातील.** मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २०% प्रमाणे Proportion काढावे. (उदा :- लेखापाल पदांची B.Com ही आवश्यक शैक्षणिक अर्हता पुर्ण करुन अतिरिक्त M.Com ही शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेल्या उमेदवारांस M.Com च्या अंतिम वर्षात ८०% गुण प्राप्त असल्यास त्यांचे २०% प्रमाणे {Proportion= ८० X २०/१०० = १६ गुण} | जास्तीत जास्त २० गुण ग्राहय धरले जातील |
| ३ | संबधित पदांशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ०६ गुण देण्यात येतील. (१ वर्षाकरीता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | जास्तीत जास्त ३० गुण ग्राहय धरले जातील. |
| | | **एकुण गुण** | **१०० गुण** |

२५) सदरील गुणांकनानुसार, गुणवत्तेप्रमाणे निवड करताना उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणांकन यादी तयार करण्यात येऊन, उमदेवारांना समान गुण असल्यास, ज्या उमेदवारांचे वय जास्त असेल त्यास प्रथमतेने निवडण्यात येईल. जर वयामध्ये एकसमानता येत असल्यास, संबधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल. यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

रा.आ.अ.महानगरपालिका आरोग्य विभाग सोलापूर

२६) **राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सद्यस्थितीत (Till Date) कार्यरत असलेल्या उमेदवारांस, मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, रा.आ.अ.,मुंबई कडील दि.२९/०९/२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार कमाल सेवा प्रवेशमर्यादा ०५ वर्षापर्यंन्त शिथील करण्यात येत आहे.** त्याकरीता उमेदवारांनी अनुभव प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य असुन, सदरील अनुभव प्रमाणपत्रामध्ये **आजतागायत (Till Date) कार्यरत** असल्यांच्या बाबीचा उल्लेख असणे अनिवार्य राहिल.

२७) अर्जासोबत नमुद करण्यात येत असलेला मोबाईल क्रमांकास Whatsapp असावे. व सदरील क्रमांक हा संपूर्ण पदभरती प्रक्रिया होईपर्यन्त चालु स्थितीत राहण्याची दक्षता उमेदवारांनी घेण्यात यावी.

(स्वाक्षरीत /-)
**जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक**
**तथा सदस्य**
**रा.आ.अ., पदभरती निवड समिती**
**सोलापुर.**

(स्वाक्षरीत /-)
**जिल्हा शल्यचिकित्सक**
**तथा सदस्य**
**रा.आ.अ., पदभरती निवड समिती**
**सोलापुर.**

(स्वाक्षरीत /-)
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**तथा सदस्य सचिव**
**रा.आ.अ., पदभरती निवड समिती**
**सोलापुर.**

(स्वाक्षरीत /-)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**तथा अध्यक्ष**
**रा.आ.अ., पदभरती निवड समिती**
**सोलापुर.**

रा.आ.अ., जि.प्र.आ.क्र.मा.MahaBharti.in आरोग्य विभाग, जि.प. सोलापूर

# कार्यालयीन अर्जाचा नमुना, सन २०२५-२६ ( १ ली जाहिरात )

## राष्ट्रीय आरोग्य अभियान,

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी,आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर.

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक व तारीख :-

| |
|---|
| अलीकडील रंगीत छायाचित्र लावावे |

प्रति,

मा. जिल्हा आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, पदभरती निवड समिती,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर.

पदाचे नाव :- ______________________________ पद क्र. … … या पदाकरीता अर्ज.

बँकेचे नाव :- ____________________ डी.डी. क्रमांक :- … … … … … डी.डी. रक्कम रु. … … … /-

१) उमेदवारांचे संपूर्ण नाव (देवनागरी/मराठी):- ______________________________

Candidate Name (English Capital) :- ______________________________

२) उमेदवारांचे बदल असलेले नाव :- ______________________________

३) उमेदवारांच्या वडील/पती संपूर्ण नाव :- ______________________________

४) उमेदवारांची जन्म तारीख :- दिवस … … … महिना … … … वर्ष … … … … …

अक्षरी जन्म तारीख :- ______________________________

______________________________

वय :- … … … … वर्षे पुर्ण, … … … … … महिणे पुर्ण, … … … … दिवस.
(जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिवशी)

५) उमेदवाराचा पत्ता :- ______________________________

______________________________

______________________________

______________________________

मोबाईल क्रमांक :- … … … … … … … … … … … … … … … … …

Email Id :- ______________________________

(नमुद करणे अनिवार्य)

६) अर्जदाराकडे राहिवाशी प्रमाणपत्र :- आहे / नाही (चुकीच्या पर्यायावर रेघ मारणे)

७) अर्जदारकडे जातीचे प्रमाणपत्र :- आहे / नाही (चुकीच्या पर्यायावर रेघ मारणे)

मुळ जातीचा प्रवर्ग :- ____________

मुळ जातीचे नाव :- ____________

अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग :- ____________

(नमुद करणे अनिवार्य)

८) अर्जदाराची वैवाहिक परिस्थिती :- विवाहीत / अविवाहीत (चुकीच्या पर्यायावर रेघ मारणे)

अर्जदाराकरीता टिप :- अर्ज कार्यालयास जमा केल्याची पोहोच पाहिजे असल्यास, सदरील पानावरील संपूर्ण माहिती भरुन झेरॉक्स काढून घेऊन येणे.

रा.आ.अ., जि.ए.आ.कु.क.सो., आरोग्य विभाग, जि.प. सोलापूर

९) पदविका (Diploma/I.T.I.) :-

| धारण केलेली पदव्युत्तर पदविका | बोर्डचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टककेवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) पदवी (Degree) :-

| धारण केलेली पदवी | विदयापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टककेवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

११) पदव्युत्तर पदवी / पदविका (Post Graduation) :-

| धारण केलेली पदव्युत्तर पदवी / पदविका | विदयापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टककेवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१२) इतर शैक्षणिक अर्हता :-

| अभ्यासक्रम /कोर्स | बोर्ड / विदयापीठ/संस्थेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टककेवारी |
|---|---|---|---|---|
| MSCIT | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१३) अनुभव तपशिल :- ( नमुद केलेल्यांचे अनुभव प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे )

| अ. क्र. | कार्यालय / विभाग / संस्थेचे नाव | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

रा.प्रा.अ., जि.प.आ.कु.क.सो., आरोग्य विभाग, जि.प. सोलापूर

१४) अर्जासोबत खालील प्रती सांक्षकित प्रती जोडलेल्या आहेत.

| | |
|---|---|
| १) ________ | २) ________ |
| ३) ________ | ४) ________ |
| ५) ________ | ६) ________ |
| ७) ________ | ८) ________ |
| ९) ________ | १०) ________ |

१५) वरील नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि बिनचुक आहे. सदर पदाकीरता विहीत केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे, याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे, मी असेही प्रमाणित करतो/करते की वर दिलेली माहिती असत्य, अथवा चुकीची किंवा दिशाभुल करणारी आढळल्यास त्यामुळे अपात्र झाल्यास किंवा नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणा-या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहिल. त्याबाबतची माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीतील नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असुन मला मान्य आहेत.

**ठिकाण :- सोलापुर.** **अर्जदार स्वाक्षरी :-** ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

**दिनांक :-     /     /२०२५.** **अर्जदाराचे नाव :-** ________

================================================================

## लहान कुटूबांचे प्रमाणपत्र - नमुना अ

(NHM कडील दि.२३/०७/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये)

मी श्री/श्रीमती/कुमारी ________

श्री. ________ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय ... ... वर्षे, राहणार ________ याव्दारे

पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी ________ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ... ... ... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ... ... ... इतकी आहे. (असल्यास जन्म दिनांक १)     /     /२०     . २)     /     /२०     .

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे शासकिय नियमानुसार मी या पदासाठी अपात्र ठरेल यांची मला जाणीव आहे.

**ठिकाण :- सोलापुर.** **अर्जदार स्वाक्षरी :-** ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

**दिनांक :-     /     /२०२५.** **अर्जदाराचे नाव :-** ________

**(टिप :- वरील लहान कुटूंबांचे प्रमाणपत्र सर्व उमेदवारांनी भरावे. उमेदवार अविवाहीत असल्यास, प्रमाणपत्रातील इतर माहिती भरुन अपत्य संख्या शुन्य (०) अथवा निरंक नमुद करावी.)**